रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली



दिनांक ९ ऑगस्ट २०१९

## सांस्कृतिक विभाग

## ऑगस्ट क्रांती दिन अहवाल

९ ऑगस्ट २०१९ क्रांतीदिन कार्यक्रम आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली) या महाविद्यालयातील इतिहास विभागामार्फत क्रांतीसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मा. श्री.कॅप्टन रामचंद्र (भाऊ) लाड उपस्थित होते.

मा.श्री.कॅप्टन रामचंद्र (भाऊ) लाड यांचे कार्य आजही तरुणांना प्रेरणादायी आहे. त्यांनी स्वातंत्र्य लढ्यातील आठवणी विद्यार्थ्यांना सांगितल्या. क्रांतीसिंह नाना पाटील यांनी या परिसराचे नेतृत्व करण्याची जबाबदारी यांच्यावर सोपवली. त्याचे त्यांनी योग्य नेतृत्व करून देशाला स्वातंत्र्य मिळून दिले. ते म्हणाले आज स्वातंत्र्य सैनिकांचा समाजाला व राज्यकर्त्यांना याचा विसर पडला आहे. ऑगस्ट क्रांती दिनाचे महत्त्व समाजाला प्रेरणादायी आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम साहेब उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात भारतीय स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या योगदानाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी बहुसंखेने उपस्थित होते.







प्रमुख
सांस्कृतिक विभाग

Ramanandnagar A.S.C. College, BURLI

प्राचार्य
आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)